# भ्रष्टाचाराने बरबटलेला बीड नगरपरिषदेचा लेखापाल गणेश पगारेला दै. महाराष्ट्र आरंभची बातमी झोंबली..!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १८४ ■ रविवार दि.२३ मार्च २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 184 ■ Sunday Dt. 23 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# नगरपरिषदेतील २०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार महाराष्ट्र आरंभने काढला बाहेर; गणेश पगारेंची अब्रूची किंमत दहा लाख का?

## संपादक दिपक थोरात यांना पाठवली नोटीस; लोकशाहीचा आवाज दाबण्याचा प्रयत्न

- जिल्हाधिकारी व पालकमंत्री यांच्या समकक्ष नीता अंधारे व गणेश पगारे यांनी पत्रकार परिषद घेऊन मीडियासमोर दै.महाराष्ट्र आरंभने विचारलेल्या प्रश्नांवर उत्तर द्यावे?
- गणेश पगारे हा अकाउंटपदाच्या लायकीचा नसताना सुद्धा त्यांच्या हातात चार्ज का? दिला व कोणाच्या आशीर्वादाने दिला?
- गणेश पगारे यांच्या विरोधात अनेक तक्रारी व गुन्हे दाखल असताना व चौकशी चालू असताना, एवढी मोठी जबाबदारी का?
- गणेश पगारे हे स्वत:ला धुतलेल्या तांदळासारखे समजत असेल तर जनतेसमोर ठामपणे बोलावे?
- जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी आता याकडे तातडीने लक्ष घालून चौकशी करणे गरजेचे!

बीड । प्रतिनिधी


बीड नगरपरिषद म्हणजे सोन्याची अंडी देणारी कोंबडी आहे. आणि ती कोंबडी आता नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे व अवैधरित्या पदभार दिलेल्या अतिरिक्त लेखापाल गणेश पगारे यांच्या हाती लागलेली आहे. या कोंबडीला चोरून खाण्यासाठी आष्टीचे आमदार सुरेश धस व परळीचे वाल्मीक कराड सुरेश धस यांच्या शिफारशीवर आलेला अतिरिक्त लेखापाल गणेश पगारे हा नीता अंधारे यांच्या माध्यमातून वाल्मीक कराडच्या संपर्कात होते. व आहेत. आज जरी वाल्मीक कराड जेलमध्ये असले तरी संपर्क बंद आहे का? चालू आहे हे सांगणे शक्य नाही. तसेच बीड नगरपरिषद मध्ये होत असलेल्या कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार होत असल्याप्रकरणी दैनिक महाराष्ट्र आरंभ या वृत्तपत्राने पुराव्यानिशी अनेक बातम्या प्रकाशित करून सदरील प्रकार उघडकीस आणला आहे. सदरील बातम्या या अतिरिक्त लेखापाल गणेश पगारे यांना झोंबल्या आहेत. त्यांनी दैनिक महाराष्ट्र आरंभच्या संपादकांना नोटीस पाठवली आहे. गणेश पगारे हे पत्रकारांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करीत आहे. दैनिक महाराष्ट्र आरंभ अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार विरोधात वाचा फोडण्याचे काम करत आहे. निर्भिड आणि निस्वार्थ भावनेने वास्तव मांडलेले हे गणेश पगारेंना झोंबत आहे. तसेच बीड नगरपरिषद मध्ये कोटी रुपयांचा भ्रष्टाचार होत असताना. आष्टीचे आमदार सुरेश धस व वाल्मीकराडांचे कार्यकर्ते व बीड नगरपरिषद मध्ये गुत्तेदारी कंट्रक्शन वेगवेगळ्या माध्यमातून पडद्यामागे उभा राहून करत आहेत.

यामध्ये मुख्याधिकारी नीता अंधारे व अतिरिक्त लेखापाल गणेश पगारे यांच्या कार्यकाळात जवळपास २०० कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचे चित्र स्पष्ट असताना. अतिरिक्त लेखापाल गणेश पगारे हा अकाउंट पदाच्या लायकीचा नसताना सुद्धा त्यांच्या हातात नगरपरिषद परिषदेचा अतिरिक्त लेखापाल पदाचा चार्ज का दिला? व कोणाच्या आशीर्वादाने दिला? हे बीड जिल्ह्याला सर्वत्र माहित आहे. याप्रकरणी दैनिक महाराष्ट्र आरंभ वेळोवेळी बातम्या प्रकाशित करून जनतेसमोर मांडत आहे. शिवाय नीता अंधारे यांनी गणेश पगारे यांना बीड जिल्ह्यामध्ये बदलीसाठी एक पत्र दिले होते. त्या पत्राच्या अनुषंगाने आष्टीचे आमदार सुरेश धस व बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी ही गणेश पगारे यांना एक शिफारस पत्र दिले. व मंत्रालयात बसून बीडला बदली करण्यासाठी कुणी प्रयत्न केले हे सर्व चित्र स्पष्ट असताना. गणेश पगारेंसाठी एका बीड नगर परिषदेतील कर्मचाऱ्यांनी थेट दिल्ली सीबीआयकडे तक्रार केलेली आहे. या तक्रारी संदर्भातील आव्हाल नीता अंधारे व गणेश पगारे यांनी दाबून ठेवलेला आहे. आज बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी मात्र आता याकडे लक्ष देणे





गरजेचे आहे. या सर्व गैरव्यवहार आणि कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार दैनिक महाराष्ट्र आरंभने वेळोवेळी बातम्या प्रकाशित करून उघडकीस आणलेला आहे. गणेश पगारे यांनी जशी दैनिक महाराष्ट्र आरंभला नोटीस पाठवली तसेच केलेला भ्रष्टाचार प्रकरणी जाहीर बोलावे? क्रिमिनल क्टनुसार फौजदारी स्वरूपाचा गुन्हा हा गणेश पगारे यांच्याविरुद्ध दाखल असून तो न्यायप्रविष्ट आहे व त्या ठिकाणी गणेश पगारेंना २६९ कलमानुसार आहे तर मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी बीड नगर परिषदेच्या अकाउंट पदाचा अतिरिक्त लेखापाल कारभार गणेश पगारे यांच्या हाती देत. बीड नगरपरिषद च्या तिजोरीच्या च्याव्या गणेश पगारे यांच्या हातात दिलेल्या आहेत. परंतु गणेश पगारे यांच्यावर संबंधित गुन्हे दाखल असताना, चौकशी चालू असताना एवढी मोठी जबाबदारी का? दिली गुत्तेदारांची राजकीय नेत्यांची मनधरणे करण्यासाठी गणेश पगारे आजही सक्रिय आहे तर गणेश पगारेंनी स्वतःचा मुलगा व मुलगी तसेच नगरपरिषद मध्ये अनेक कर्मचारी नोकरीला लावलेले आहेत. तर बीड नगरपरिषद मध्ये नोकरी विक्रीचे मोठे रॅकेट सक्रिय असल्यामुळे त्या ठिकाणी गणेश पगारे पासून चौकशीची सुरुवात व्हायला पाहिजे. अगोदर कोणाची नोकरी कोणी घेतली. व कोणाच्या मुलाला त्या ठिकाणी जात धर्म बदलू शंभर रुपयांच्या बॉण्ड वरती नोकरी दिली. याची देखील चौकशी होणे तितकेच गरजेचे आहे. तसेच बीड शहरातील २०० कोटी रुपयांच्या बीड नगर परिषदेच्या विविध लेखा विभागातील पैसे कोणाला वळविले व गणेश पगारे हे धुतलेल्या तांदळासारखा जर स्वतःला समजत असेल, तर गणेश पगारे यांनी आता बीड नगर परिषदेच्या दैनिक महाराष्ट्र आरंभ मध्ये आलेल्या अनेक बातम्यांचा खुलासा, जिल्हाधिकारी व पालकमंत्री यांच्या समकक्ष गणेश पगारे व नीता अंधारे यांनी बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयात किंवा शासकीय विश्रामगृह येथे एक पत्रकार परिषद घेऊन मीडियासमोर दैनिक महाराष्ट्र आरंभ ने विचारलेले प्रश्नाचे उत्तर द्यावे. तसेच २०२२ मार्च ते २०२५ मार्च पर्यंत एकूण बीड नगर परिषदेने शहराच्या विकासासाठी किती निधी खर्च केला. व महाराष्ट्र शासनाकडून आमदार, खासदार, मुख्यमंत्री केंद्र राज्य सरकारकडून दलित वस्ती सह विविध भागातून बीड नगर परिषदेचा कारभार कसा हाकला गेला व किती खर्च केला. या लेखा विभागातील खर्चाचे बँकेच्या अकाउंटचे स्टेटमेंट घेऊन आणि दैनिक महाराष्ट्र आरंभ च्या बातम्यांवर हिमत असेल तर नीता अंधारे व गणेश पगारे यांनी एक पत्रकार परिषद घ्यावी.



# आष्टीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते महेबुब शेख यांच्याकडून मुस्लिम बांधवांना इफ्तार पार्टी

आष्टी । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीचे युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांच्या वतीने आष्टी तालुक्यातील मुस्लिम बांधवांसाठी शुक्रवार दि.२१ मार्च रोजी शहरातील ईदगाह मैदान येथे सायंकाळी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.

सध्या मुस्लिम धर्मातील पवित्र रमजानचा महिना सुरू आहे. या महिन्यांच्या अखेरच्या टप्प्यात मुस्लिम बांधवांसाठी विविध राजकीय पक्षाकडून रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात येते. अशातच आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे नेते तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीचे युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांच्या वतीने देखील आष्टी तालुक्यातील व आष्टी,मुर्शदपुर शहर परिसरातील मुस्लिम बांधवांसाठी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम वर्ष असून महेबुब शेख यांच्याकडून मुस्लिम बांधवांसाठी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.



सदरील रोजा इफ्तार पार्टीमध्ये माजी जिल्हा परिषद सदस्य सतिश शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीचे तालुकाध्यक्ष परमेश्वर शेळके, आण्णासाहेब चौधरी, राम खाडे डॉ. शिवाजी राऊत, सुनिल नाथ, संजय थोरवे, डॉ. नदीम शेख, ॲड रिजवान शेख, जिशान सय्यद, दादासाहेब झांजे, जगन्नाथ ढोबळे, डॉ विलास सोनवणे, डॉ राज शेख, विजय गाढवे, शफ्फी सय्यद, शेरूभाई शेख, माऊली मुटकुळे, सादीक कुरेशी, गणीभाई तांबोळी, अतुल शिंदे, शब्बीर शेख, मोसिम पठाण, सचिन गोंदकर, अशोक पोकळे, शिवाजी सुरवसे, ॲड बी सी शेख, लईकशेठ काझी, मोहसिन कुरेशी, लहू भवर,शाहुल काकडे, तोफीक शेख, रजी बेग, वसिम बारी, अन्वर अत्तार, मोहम्मद कुरेशी, निसार कुरेशी, गुलाम हाबीज साहेब, असद सय्यद, कलील शेख, जाकीर अत्तार, ॲड वहिम शेख, हमीद बेग तसेच कार्यकर्ते, डॉक्टर, वकील, पत्रकार, सर्व क्षेत्रातील मान्यवर व हिंदू, मुस्लिम समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रेशन दुकानदार यांचे प्रश्न सोडवा अन्यथा महाराष्ट्रभर संप

धारूर । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील रेशन दुकानदार यांचे प्रश्न सोडवा अन्यथा महाराष्ट्रभर संप करण्याचा इशारा देण्यात आला आहे मागणया संदर्भात लवकरच धारूर तहसीलदार यांना निवेदन देण्यात येणार असून जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत संघटनेच्या वतीने महाराष्ट्र भर संप करण्यात येणार आहे. राज्यातील सुमारे ५४ हजार रास्त भाव धान्य दुकानदारांचे (रेशनकार्ड दुकानदार) विविध प्रश्न अद्याप प्रलंबित आहेत. या प्रश्नांची सोडवणूक येत्या दीड महिन्यात करण्यात यावी. अन्यथा मे महिन्यापासून ऑल महाराष्ट्र फेअरप्राईज शॉपकिपर्स फेडरेशनच्या वतीने संप पुकारण्यात येईल, असा इशारा धारूर तालुका अध्यक्ष स्वस्त दुकान भारत वावळकर यांच्या सह बीड जिल्हाध्यक्ष समीर खान यांच्या वतीने बीड जिल्ह्यात सर्वच स्वस्थ भाव दुकानदार यांनी संपचा इशारा दिला आहे.

राज्यातील रेशन दुकानदारांकडे सध्या कोणाचेही लक्ष नाही. ई-केवायसी करण्यासाठी ३१ तारखेपर्यंत मुदत दिलेली आहे. मात्र, ई-पॉस मशीन नेहमी बंद असते. धान्य वेळेवर पोहचत नाही. धान्य पुरवठ्याची साखळी विस्कळीत झालेली आहे. धान्य दर महिन्याला १ ते ५ तारखेपर्यंत दिले गेल्यास त्याचे वाटप रेशनकार्डधारकांना करणे शक्य होणार आहे. त्याशिवाय, नोव्हेंबर महिन्यापासून दुकानदारांना राज्य सरकारकडून कमीशनची रक्कम मिळालेली नाही. दुकानदारांना प्रति किलो धान्य वाटपामागे दीड रुपया कमीशन मिळते. जे दुकानदार त्यावर अवलंबून आहेत त्यांना वीजविल भरणे, कामगारांचा पगार देणे तसेच स्वतःचा खर्च भागविणे मुश्किल होत आहे. या सर्व समस्यांची सोडवणूक न झाल्यास ऑल महाराष्ट्र भारत यांचा वतीने दिशा ठरवून संप करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्याबाबतचा निर्णय बीड जिल्हाध्यक्ष समीर खाना यांच्या वतीने बैठकीत घेण्यात आला आहे, असे भारत वावळकर यांनी नमूद केले.

राज्यभरातील रास्त भाव धान्य दुकानदारांना राज्य सरकारने नोव्हेंबर महिन्यापासून प्रतिकिलो धान्य वाटपामागे देण्यात येणाऱ्या कमीशनची रक्कम दिलेली नाही. त्याशिवाय, दुकानदारांना दर महिन्याला वेळेवर धान्य पोहच होत नाही. अनेक वेळा पत्रव्यवहार करूनही ई-पॉस मशीनवर ई-केवायसीसाठी अडचणी येत आहेत. काही वेळा मशीन बंद असते. परराज्यातील नागरिकांचे ई-केवायसी होत नाही. याबाबत राज्य सरकारने भूमिका स्पष्ट करावी. त्याचप्रमाणे, सध्या ई-केवायसीसाठी असलेली ३१ मार्चपर्यंतची मुदत वाढविण्यात यावी.



# गरजू महिलांना संत गोरोबाकाका संस्थेच्या वतीने शिलाई मशीन वाटप

शिरुर कासार । प्रतिनिधी

समाजातील विधवा, घटस्फोटीत अशा गरजू महिलांसाठी तालुक्यातील ब्र.येळंब येथील संत गोरोबाकाका बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने (दि. ८) शनिवार रोजी शहरातील कालिकादेवी विद्यालयात शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले.

जागतिक महिला दिनानिमित्त महिला बचत गट मेळावा घेत शहरातील कालिकादेवी विद्यालयात ब्र.येळंब येथील संत गोरोबा काका बहुउदेशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने विधवा, धट्स्फ़ोटित अश्या महिलांना (दि. ८) शनिवार रोजी शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. यावेळी तालुक्यातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या तसेच तहसीलदार सुरेश घोळवे यांनी पुढे बोलताना सांगितलले कि महिलांनी आपल्या पायावर उभे राहत व्यवसायाकडे वळत छोटा मोठा व्यवसाय सुरु करावा यातून कुटूंबाच्या दैनंदित खर्चात हातभार लागत मदत होते.


महिलांनी स्वावलंबी बनले पाहिजे ठिकठिकाणी महिला आपल्या कामातून वेगळा ठसा उमटत आहेत. ग्रामीण भागातील महिलांनी पुठे येत व्यवसाय सुरु करावा असे मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य विश्वास कंधारे, पो.नी गणेश ढोकरट, गटविकास अधिकारी संजय केंद्र, संस्थेचे सचिव अंबादास गोरे तसेच महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# बीडमधील आत्महत्याग्रस्त शिक्षक धनंजय नागरगोजे यांच्या कुटुंबियाला ॲड.माधव जाधव यांनी केली २५ हजार रुपयांची मदत

केज । प्रतिनिधी

देवगाव ता.केज जिल्हा बीड येथील रहिवासी असणारे शिक्षक धनंजय नागरगोजे यांनी नुकतीच काही दिवसापूर्वी बीड येथील बँकेच्या समोर गळफास घेऊन आत्महत्या केली.१८ वर्ष शिक्षकाची नोकरी मोफत केल्यानंतर सुद्धा त्यांना पगार चालू न झाल्यामुळे धनंजय नागरगोजे यांनी तीन वर्षाच्या लहान मुलीला उद्देशून फेसबुक वर पोस्ट टाकून स्वतःची जीवन यात्रा संपवली. मयत शिक्षक धनंजय नागरगोजे यांना तीन वर्षाची एक लहान मुलगी व त्याचप्रमाणे त्यांची पत्नी ही सहा महिन्याची गरोदर आहे. घरामध्ये वृद्ध आई-वडील आहेत.

अशा परिस्थितीमध्ये धनंजय नागरगोजे यांनी अतिशय टोकाचे पाऊल उचलून आत्महत्या केली.त्यामुळे संपूर्ण कुटुंब दुःखामध्ये व संकटामध्ये आहे. ॲड. माधव जाधव यांनी देवगाव ता.केज जिल्हा बीड येथे जाऊन मयत धनंजय नागरगोजे यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन मयत धनंजय नागरगोजे यांचे वडील भानुदासराव नागरगोजे व भाऊ गणेश नागरगोजे यांच्याकडे जय भारती बहुउद्देशीय सेवाभावी प्रतिष्ठान मार्फत २५ हजाररुपयाचा धनादेश देऊन या कुटुंबाला आर्थिक मदत केली.यावेळी ॲड.माधव जाधव यांचे सोबत ॲड.रणजीत खोडसे, श्री. देविदास नागरगोजे, सुनील घोळवे, शरद मुंडे, अशोक नागरगोजे, सदाशिव मुंडे, ॲड.एस. एल.गलांडे, ॲड.एस.व्ही. गलांडे, ॲड.एम.एल. भोसले, ॲड.पी.डी.इतापे, ॲड.काझी, सुग्रीव आप्पा अंबाड व ग्रामस्थ यावेळी उपस्थीत होते.



# किट्टी आडगांव येथे कार्यरत इंजिनिअर मुकुंद शिंदे हफ्ते टाकण्यासाठी करतात पैशाची मागणी?

## मुळूक मॅडम या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर तुमचाच आशीर्वाद आहे का ? कारवाई करण्यास टाळाटाळ का?

माजलगांव । प्रतिनिधी

सविस्तर माहिती अशी की ग्रामपंचायत कि. आडगाव येथे कार्यरत असलेले इंजिनियर मुकुंद शिंदे व रोजगार सेवक हे घरकुल लाभार्थ्यांचे मस्टर व हप्ते काढण्यासाठी पैशांची मागणी करत आहेत व पैसे दिले नाहीत तर हप्ते काढत नाही अशी धमकी देतात यामुळे यांच्या या भ्रष्ट कारभाराची चौकशी झालीच पाहिजे.माजलगाव पंचायत समितीत भ्रष्टाचाराचा महापूर आलेला असून याकडे माजलगाव बीडीओ मुळूक मॅडम उघड्या डोळ्यांनी बघत आहेत पण कारवाई का करत नाहीत. मुळुक मॅडम यांच्याकडे वारंवार नागरिकांनी तक्रारी करूनही त्याची दखल घेतली जात नाही यामुळे मुळूक मॅडम तुम्ही पण या भ्रष्टाचारामध्ये सामील आहात का असा सवाल सामान्य नागरिक करत आहेत. बोगस घरकुलांचे हप्ते सोडून अनेक इंजिनिअर प्रति घरकुल २० ते ३० हजार रुपये लाभार्थ्यांकडून वसूल करत आहेत तरीही यांच्यावर कारवाई का होत नाही. कि.आडगाव येथील इंजिनीयर मुकुंद शिंदे व रोजगार सेवकसेवक हे प्रत्येक पाणी अहवाल करताना लाभार्थ्यांना पैशाची मागणी करतात व जे लाभार्थी पैसे देत नाहीत त्यांचे हप्ते टाकत नाहीत त्यांना अरेरावीची व मुजोरीची भाषा करतात. घरकुल असते दीड लाखाचे पण या भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या खिशात २० ते ३० हजार रुपये जातात. घरकुल बांधकाम हे शासन नियमानुसार केलेले असूनही इंजिनिअर हे त्यामध्ये नागरिकांना पाणी अहवाल करत असताना अतिरिक्त पैशाची मागणी करून नागरिकांना त्रास देत आहेत यामुळे नागरिक यांच्या या भ्रष्टाचारी कारभाराला अतिशय वैतागलेले आहेत तात्काळ जर या इंजिनीयर व रोजगार सेवक यांच्यावर कारवाई झाली नाही तर आपल्या पंचायत समिती कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा कि.आडगाव येथील नागरिकांनी दिलेला आहे.

**ऑनलाइन सेवा केंद्रावर इंजिनिअर शिंदे यांच्या पैशाचे कनेक्शन...**

कि.आडगाव येथील नागरिकांकडून पैशाची मागणी केल्यानंतर नागरिकांना कि.आडगाव येथील एका ऑनलाइन सेवा केंद्रावर पैसे द्या किंवा फोन पे ला टाका असे सांगण्यात येते व नागरीकांकडून लूट केली जाते यामुळे नागरिक त्रस्त झालेले आहेत. या ऑनलाइन सेवा केंद्रावर पैसे दिलेल्या एका नागरिकांचा पुरावा देखील दैनिक आरंभ च्या हाती लागलेला आहे त्यामुळे आपण संबंधित इंजिनियर मुकुंद शिंदे व रोजगार सेवक यांच्यावर तात्काळ कार्यवाही करावी. दैनिक आरंभ ने मुळूक मॅडम आपल्याकडे अनेक ग्रामपंचायत मधील भ्रष्टाचारांची तक्रार केलेली आहे तरीही आपण यावर कारवाई का करत नाहीत.

# तुलसी शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे हाँगकाँग येथे लोकमतच्या ग्लोबल कन्वेंशन पुरस्काराने सन्मानित



**समाजसेवेचा तुम्ही करुनी स्वीकार,**
**देवगिरी संस्थेचा पताका फडकवला सात समुद्रापार,**
**असाच होवो तुमचा सर्वत्र जयजयकार,**
**मनापासून तुमचे खूप खूप अभिनंदन रोडे परिवार.....**

सर्वप्रथम प्रा.प्रदीप रोडे सरांना आणि श्रीमती.दीपा मॅडम व रोडे परिवार ला लोकमत तर्फे दिल्या गेलेल्या ग्लोबल अवॉर्ड ऑफ एक्सलन्स पुरस्कार २०२५ प्राप्त झाल्यामुळे खूप खूप अभिनंदन. आजवर माझा जिल्ह्यातील व जिल्हा बाहेरील बऱ्याचशा नामांकित मान्यवरांबरोबर विविध माध्यमातून संपर्क आला. मात्र आदरणीय रोडे सरांसारख व्यक्तिमत्व क्वचित पाहायला मिळाले. अत्यंत साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हे सरांचे वैशिष्ट्य आहे. देवगिरी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून सरांनी लावलेले बीज आज भल्या मोठ्या वटवृक्षा प्रमाणे पसरले आहे. कित्येक गरजू वंचित गरीब मुलांचे उद्याचे भवितव्य सावरण्यात ही संस्था मदत करत आहे यासारखी सेवा दुसरी कुठली नसेल. रोडे परिवार जिल्ह्यात एवढी मोठी हस्ती असताना त्यांच आपल्या संस्थेतील मुलांबद्दल, संस्थेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांबद्दल आणि इतर अडचणीत असणाऱ्या लोकांना सहकार्य करण्याबद्दल ची भावना मला थक्क करून जाते. मी दीपा रोडे मॅडमचे तेवढेच आभार मानते ज्या रोडे सरांबरोबर खांद्याला खांदा लावून त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या आहेत. ज्यांनी आपले जीवन स्वतः पेक्षा संस्थेला आणि सरांना समर्पित केले आहे. मनुष्याला कुटुंबाचे पालन पोषण करण्यात कधी कधी वैताग येतो, मात्र रोडे सर, मॅडम व त्यांचे कुटुंब कित्येक कुटुंबांची उपजीविका भागवत आहेत. कित्येक गरीबांचे आशीर्वाद आज सरांना लाभत असतील या बद्दल मन प्रसन्न होते. समाजात कोणाला पण विचारले तर प्रत्येक व्यक्ती रोडे सरांना आदराने संबोधित करतात, समाजात असलेला हा आदर मिळवण्या साठी त्यांनी केलेले प्रामाणिक कष्ट आणि निस्वार्थ सेवाभाव यामुळे आहे.जेव्हापासून माझा तुलसी शैक्षणिक समूह व वसतिगृहामधील मुलांना योगाचे प्रशिक्षण देण्याकरिता जाण्याचा योग आला, तेव्हा मला तिथल्या कर्मचाऱ्यांनी सांगितले की रोडे सरांचा स्पष्ट सूचना असतात की मुलांना कसल्याही गोष्टीची कमतरता आणि उणीव भासली नाही पाहिजे, त्यांच्या खानपानाची सोय एवढी उत्तम चालवतात की मुलांना आपण वसतिगृहामध्ये राहत आहोत याची जाणीव देखील होऊ देत नाहीत. स्वतःच्या मुलाप्रमाणे ते मुलांची काळजी घेतात अगदी आजारी असल्यास डॉ. मेडिसिन पासून. स्वतः रोडे सर एवढ्या मोठ्या संस्थेचे डायरेक्टर असताना देखील वसतिगृहाच्या लहान मुलामुलींसोबत जेवायला बसतात आणि जे मुलांना खायला आहे तेच स्वतः खातात असे व्यक्तिमत्व माझ्या आजपर्यंत पाहण्यात नाही. मुलांचे आरोग्य सुदृढ रहावे यासाठी त्यांनी वसतिगृहामध्ये योग सत्र चालू केले आहे जे की सहसा बघायला मिळत नाही. मुलामुलींना सुट्टी असल्यास रोडे मॅडम सुद्धा वसतीगृहात जाऊन मुलामुलीं सोबत वेळ घालवतात. संपूर्ण रोडे परिवार अतिशय शांत, संयमी ,साधे राहणीमान तसेच श्रेष्ठ विचारसरणी असलेले मला पराकोटीची प्रेरणा देऊन जाते. मला सार्थ अभिमान वाटतो की मी या तुलसी शैक्षणिक समूहाचा एक योग शिक्षक म्हणुन काम करत आहे. समाजात कित्येक काळापासून ईश्वराने तुमच्यासारखे व्यक्ति पाठवलेले आहेत जे निस्वार्थ भावनेने जनतेची सेवा करतात म्हणूनच तुम्ही वंचितांसाठी गरिबांसाठी गरजूसाठी ईश्वराच्या समान भासतात.

**योगतज्ञ डॉ.राधा सचिन तांबे/घोलप**
आंतरराष्ट्रीय योग खेळाडू बीड
संचालिका राधिका ॲडव्हान्स योगा सेंटर बीड
योग शिक्षक प्रा.आ. केंद्र चराटा बीड

# पवनचक्की कंपन्यांनी शेतकऱ्यांना मावेजापोटी दिलेले धनादेश वठलेच नाहीत

## बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील प्रकार; जिल्हा प्रशासनाची भूमिका म्हणजे कुंपनच शेत खातंय

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

**बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील रिन्यु ग्रीन पवनचक्की कंपनीने शेतकऱ्यांना मावेजा पोटी दिलेले धनादेश वठले नसल्याने व विचारणा केल्यानंतर आधिकारी उडवाउडवीची उत्तरे देत टाळाटाळ करत असल्याने शेतकऱ्यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली आहे.बीड तालुक्यातील बालाघाटावरील पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार सुरूच असुन जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासनाची भूमिका शेतकऱ्यांना न्याय भुमिकेतुन संरक्षण देण्याऐवजी पवनचक्की कंपन्यांची पाठराखण करण्याची असुन कुंपनच शेत खात असेल तर दाद कोणाकडे मागायची अशी संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली आहे.**

बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील शेतजमिनीत रिन्यु ग्रीन एम.एच.पी.वन. प्रायव्हेट लिमिटेड नवी दिल्ली या कंपनीने पवनचक्की उभारली आहे. पवनचक्कीची उभारणी करताना काही क्षेत्र पवनचक्की भागात आणि काही क्षेत्र रस्ता शेतातुन गेल्याने पवनचक्की कंपन्यांच्या आधिकाऱ्यांनी पंजाब नॅशनल बँकेचे धनादेश खाते क्रमांक ७८३५००२१०००० २८६४ वरून शेतकरी अंबादास रामकिसन ढास यांना १,४९,८१३ रूपये चेक नंबर ५२३५२८, शेतकरी सुभाष रामकिसन ढास यांना १,३८,०६३ चेक नंबर ५२३५२९ आणि शेतकरी शेषेराव रामकिसन ढास यांना १,३८,०६२ रूपये चेक नंबर ५२३५३० अशी एकुण रक्कम ४,२५,९३८ रुपये किंमतीचे धनादेश वठलेच नाहीत. संबंधित प्रकरणात पवनचक्की कंपन्यांच्या आधिकाऱ्यांना विचारणा केली असता अगोदर उडवाउडवीची उत्तरे दिली असुन आता फोन घेण्यास सुद्धा टाळाटाळ करत असल्याची तक्रार अंबादास ढास यांनी केली आहे.

**उभ्या ज्वारीच्या पिकातुन गाड्या घातल्या कडब्याचे नुकसान झाले त्याचीही भरपाई अद्याप दिलीच नाही : संदिप ढास**

महिनाभरापूर्वी आमच्या शेतातील ज्वारीच्या उभ्या पिकातुन सहमतीशिवाय पवनचक्की प्रकल्प उभारण्यासाठी पोकलेन, जेसीबी,पिक अप अशा विविध वाहनांची वाहतूक केली. तेव्हा तुम्हाला नुकसान भरपाई देण्यात येईल असे सांगितले. परंतु पवनचक्की प्रकल्प उभारल्यानंतर अद्याप नुकसान भरपाई दिलीच नाही.जवळपास ८०० कडबा आणि ज्वारीची कणसे धुळीमुळे खराब झाली आहेत. अगोदर दिवसातुन ४-५ वेळा मनधरणी करण्यासाठी येणारे अधिकारी आता फोन सुद्धा उचलत नाहीत. या प्रकरणी उद्या सोमवारी जिल्हाधिकारी बीड व पोलीस अधीक्षक बीड यांना लेखी तक्रार करणार असल्याचे संदिप ढास यांनी सांगितले.

**पवनचक्की कंपन्यांची पाठराखण तर पिडीत शेतकऱ्यांना वालीच नाही : डॉ.गणेश ढवळे**

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा आणि कामगार विभागाने दि.२१ आक्टोबर २०२३ रोजी पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय संनियंत्रण समित्यांची स्थापना केली असुन पवन ऊर्जा प्रकल्पाशी निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहाराबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चितता तपासणे, जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यावहारिक मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे.पवन ऊर्जा प्रकल्पाबाबत समितीकडे आलेल्या तक्रारींची चौकशी करून त्यावर योग्य कारवाई करणे.शेतकरी आणि ग्रामस्थ आणि प्रकल्प विकासक यांच्यामध्ये समन्वय ठेवणे आदि त्यांची कामे असुन जिल्हाधिकारी समितीचे अध्यक्ष तर पोलिस अधीक्षक सदस्य आहेत.मात्र या समित्या केवळ कागदावर कार्यरत असुन जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षक केवळ पवनचक्की कंपन्यांचीच पाठराखण करत असुन पिडीत शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले असुन जिल्हा प्रशासनाची भूमिका कुंपनच शेत खातंय अशी झाल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केली आहे.



# अनेक योजना शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकारने दिले आहेत त्याचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा : आ.सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांनी केंद्र सरकार व राज्य सरकारच्या ज्या योजना असतील त्या राबवत त्याचबरोबर नवीन नवीन उद्योग उभा करावीत शेतमाल तारण योजना करण्यासाठी गोडावुन बांधावा अशी प्रतिपादन आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे आ. सुरेश (आण्णा) धस यांनी व्यक्त केले महाकिसान संघ कृषी प्रोडूसर कंपनी मार्फत सांगवी पाटण येथे शासकीय हमीभाव तूर खरेदी केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते ते बोलताना पुढे म्हणाले की, सोयाबीनचा पेरा तालुक्यात हळूहळू वाढत चालला आहे दौलवडगाव ते हातोला सोयाबीन कडे वळतोय सोयाबीनचे उत्पादन वाढवणे आता गरजेचे झाले आहे तसेच शेतीवर आधारित उद्योग उभारणे ही आता काळाची गरज असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. आ.सुरेश धस यांनी नवनाथ भगत यांचे कौतुक केले. फार मेहनती मुलगा आहे. त्याचं बरोबर सांगवी पाटण येथील आदित्य अशोक खिलारे यांची इंडियन आर्मी मध्ये निवड झाली त्याबद्दल सत्कार करण्यात आला.




या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून आ.सुरेश आण्णा धस,ह.भ.प काशिनाथ महाराज शास्त्री, ह.भ.प सुदर्शन मुनी महाराज शिंदे, ह.भ.प अशोक महाराज भोसले, ह.भ.प आप्पा महाराज भगत, मा. शत्रुघ्न (बापू) मरकड, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, कार्यक्रमाचे अध्यक्ष उद्धव पवार, नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, शिवाजी नाकाडे, एन.टी भाऊ गर्जे, नवनाथ तरटे, सरपंच दत्तात्रय खोटे, अशोक गर्जे, सरपंच मनोज गाढवे, मुळीक सरपंच, संजय पवार, धनंजय तरटे, नामदेव काकडे, सरपंच मोहन आमटे, शेषराव गर्जे फौजी, सुंदरलाल गर्जे, डॉ.राम तरटे, सरपंच अभय गर्जे, बाबासाहेब भोसले, महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे मॅनेजर सचिन औटे, एच.डी.एफ.सी बँकेचे मॅनेजर चौधरी, बद्रिनाथ तरटे, दत्तात्रय भोसले, जगन्नाथ खिलारे, आसराजी खिलारे, परसराम खिलारे, बबन जगताप, लक्ष्मण भोसले, फौजी, बशीर शेख, सय्यद मिस्तरी, डॉ. पुरुषोत्तम बावदानकर, बाळासाहेब भवर, भाऊसाहेब भवर, निलेश पोकळे, पत्रकार सुरेश कांबळे, पत्रकार शरद गर्जे, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार समीर शेख व पंचक्रोशीतील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला कार्यक्रम प्रसंगी सुरडी येथील माजी सरपंच अशोक गर्जे तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांचे समयोजित भाषणे झाली.सूत्रसंचालन विजय मरकड यांनी केले तर उपस्थितांचे आभार नवनाथ भगत यांनी मानले.



# राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी हिंगोली तालुक्याची बैठक संपन्न

**हिंगोली । प्रतिनिधी**

शहरातील शिवाजी देशमुख सभागृह येथे राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीची तालुका कार्यकारिणीची बैठक हिंगोली तालुकाध्यक्ष रवी डोरले यांच्या नेतृत्वात शनिवारी २२ मार्च रोजी दुपारी दोन वाजता पार पडली या बैठकीला राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीचे हिंगोली जिल्हाध्यक्ष बिडी दादा बांगर दिव्यांग सेलचे प्रदेश कार्याध्यक्ष रामदास पाटील सुमठानकर प्रकाशराव थोरात विश्वनाथ घुगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या बैठकीत राष्ट्रवादी कॉँग्रेसचे हिंगोली जिल्हाध्यक्ष बिडी बांगर यांनी आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीची तयारी कशी करावी व हिंगोली तालुक्यातील सर्वच गावामध्ये गाव तिथे राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या शाखा व घर तिथे राष्ट्रवादीचा कार्यकर्ता तयार करण्यासाठी सूचना दिल्या व पक्षाची सुरू असलेली सदस्य नोंदणी गाव वस्ती तांड्यापर्यंत कार्यकर्त्यांनी करावी व राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीचे संघटन मजबूत करून पक्षाची ताकद वाढवावी व सरकारच्या विविध योजना तळागाळापर्यंत कशा पोहोचतील त्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावे असे सांगितले यावेळी हिंगोली तालुक्याची कार्यकारणी देखील जाहीर करण्यात आली यामध्ये राष्ट्रवादीचे हिंगोली तालुका उपाध्यक्षपदी दत्तराव नवघरे, प्रकाश दिपके कैलास डांगे केशव कोरडे गणेश दहातरे तर राष्ट्रवादी हिंगोली तालुका सचिव पदी गणेश डोलारे हिंगोली तालुका संघटक पदी रमेश कामखेडे हिंगोली तालुका सहसंघटक पदी प्रकाश भाकरे तालुका सहसचिव गणेश जाधव तालुका कोषाध्यक्षपदी बळीराम घोंगडे तालुका कार्यकारणी सदस्य पदी माधव गायवळ एकनाथ लोथे माधव सोमोसे या सर्वांचे निवड करून त्यांना नियुक्तीचे पत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला व पक्ष संघटना वाढी संदर्भात जोमाने काम करण्याचे आदेश तालुका कार्यकारणीला देण्यात आले.


यावेळी राष्ट्रवादीचे युवक प्रदेश सचिव सुजय देशमुख सेनगाव तालुकाध्यक्ष विकास शिंदे, हिंगोली शहराध्यक्ष केशव दुबे ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष विकी देशमुख विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष तेजस पवार दिव्यांग आघाडीचे जिल्हाध्यक्ष शेषराव कावरखे सोशल मीडियाचे जिल्हाध्यक्ष बबलू सय्यद माजी पंचायत समिती सदस्य दूल्हे खान पठाण युवक शहराध्यक्ष हिंगोली स्वप्निल इंगळे युवा नेते सुरज वडकुते, सांस्कृतिक आघाडीचे जिल्हाध्यक्ष सागर चौधरी महेश थोरात शेख हनीफ विशाल काळे सचिन मस्के चक्रधर जगताप जुनेद शेख सुभाष झाडे यांच्यासह राष्ट्रवादीचे सर्व आघाड्याचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'तेजस'च्या अध्यक्षपदी ॲड.प्रकाश कवठेकरांची फेरनिवड

**बीड । प्रतिनिधी**

तेजस अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या अध्यक्षपदी तिसऱ्यांदा ॲड.प्रकाश कवठेकर यांची निवड झाली आहे. मागील आठ वर्षात तेजस अर्बनने आपली पत कायम राखली आहे.

तेजस अर्बन को.ऑपरेटिव्ह केडीट सोसायटीच्या मुख्य शाळेत पदाधिकारी यांच्या निवडीसाठी बैठक आयोजित केली होती. यावेळी उपाध्यक्षपदी दत्ता सर्जेराव घरत तर सचिवपदी रामदास सुंदर ठोसर यांची निवड केली. ॲड.प्रकाश कवठेकर यांनी मागील आठ वर्षापुर्वी तेजस अर्बन को.ऑपरेटिव्ह सोसायटीची स्थापना केली. बीड, डोंगरकिन्ही, वैद्यकिन्ही, उखंडा अशा चार ठिकाणी चार शाखा उघडण्यात आलेल्या आहेत. या ठिकाणी ठेवीदार मोठ्या विश्वासाने व्यवहार करत आहेत. ॲड.कवठेकर यांनी तेजस अर्बनच्या माध्यमातून ग्रामीण भागातील तरूण आणि बचतगटातील सदस्यांच्या हाताला काम देण्यासाठी आणि उद्योग व्यवसायाला चालना देण्यासाठी मोठ्या प्रमाणात कर्ज वाटप केले आहे. यामुळे तेजस अर्बन नावारूपाला आली आहे. ॲड.प्रकाश कवठेकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजीत केलेल्या बैठकीला पीठासन अधिकारी म्हणून एस.एस.सांगुळे हे होते तर उपस्थित जेष्ठ संचालक शिवाजी लोखंडे, बाबुराव कदम, ज्ञानेश्वर आगे, कैलास किर्दत, रामेश्वर गाडे, दिनेश जाधव, लिंबाजी भोंडवे आदी उपस्थित होते.



# राज्यस्तरीय संविधान कवी संमेलन संपन्न

**बीड । प्रतिनिधी**



राज्यस्तरीय संविधान सन्मान परिषद २०२५ चे नुकतेच आयोजन मुख्य संयोजक प्रा.भरत शिरसाठ यांनी संविधान नगरी हॉटेल कृष्णा मैदान एरंडोल जिल्हा जळगाव येथे भव्य दिव्य स्वरूपात आयोजित केले होते. यामध्ये ज्येष्ठ साहित्यिक शुक्राचार्य गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली नुकतेच राज्यस्तरीय संविधान कवी संमेलनाचे एक सत्र संपन्न झाले.

या संमेलनात महाराष्ट्रातील विविध भागातील निमंत्रित कवींची उपस्थिती लाभली. यामध्ये जीवन संघर्षकार फेम नवनाथ रणखांबे (सांगली), भटू जगदेव (भिवंडी) विजयकुमार भोईर (भिवंडी), शाम बैसाने (पवई), श्रीकृष्ण टोबरे (मुंबई), राजरत्न राजगुरू (बदलापूर), भरत शिरसाठ (एरंडोल), प्रवीण महाजन, महामुनी, भास्कर अमृत (धुळे), सागर निंबा बडगुजर, सुरेंद्र शिंदे (ठाणे) वसंत हिरे (मुलुंड) वर्षा शिरसाठ आदी कवींनी कवितांचे सादरीकरण छान करून कविसंमेलनाची रंगत वाढवली. संविधानाची मूल्ये, महामानवाचे विचार आणि मानवतावादी विचारांची उधळ कवितेतून झाली. कवींना यावेळी सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

# वैद्यनाथ कॉलेजमध्ये जागतिक जल दिन साजरा

## जलसंवर्धन ही काळाची गरज : प्रा.डॉ.संतोष रणखांब

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

जवाहर शिक्षण संस्थेचे वैद्यनाथ कॉलेज अंतर्गत कॉटिल्य ग्रीन क्लब च्या माध्यमातून वनस्पती शास्त्र व भूगोल विभागाच्या वतीने आयोजित जागतिक जल दिन २०२५ चे आयोजन केले. यावर्षीची युनोस्को ची थीम हिम नद्यांचे जतन द्या अनुषंगाने विशेष व्याख्यानासाठी प्रा.डॉ. संतोष रणखांब यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वैद्यनाथ कॉलेजच्या प्राचार्य डॉ.एआर चव्हाण मॅडम होत्या. व विशेष उपस्थिती म्हणून उपप्राचार्य प्रा.डी.के. आंधळे, प्रो.डॉ.व्हि.बी. गायकवाड व सिनेट सदस्य डॉ.पी.एल कराड, डॉ.टी.ए. गित्ते व कार्यालयीन अधीक्षक अशोक रोडे यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमास महाविद्यालयातील वरिष्ठ प्राध्यापक, विभाग प्रमुख, कनिष्ठ विभागाचे प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी यांनी बहुसंख्य विद्यार्थी विद्यार्थिनींची उपस्थित होती. कार्यक्रमाचे प्रस्ताविक भूगोल विषयाचे प्राध्यापक संजय रणखांबे यांनी केले जलदिनाची औचित्य साधून या वर्षाची थीम हिमनद्या यांचे उगम स्थान व गोड्या पाण्याची मुख्य स्त्रोत आणि पाण्याचे महत्व पटवून दिले.




पर्यावरण व पाणी याचे जतन करणे असा संदेश त्यांनी दिला. महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र व भूगोल विभागाच्या विद्यार्थ्यांनी जनसंवर्धन व महत्त्व या विषयावर अनेक भीतीपत्रकाची सादरीकरण केले. त्यांचे प्राचार्य यांनी सर्वांचे विशेष अशी कौतुक केले. प्रमुख व्याख्याते यांचा विशेष असा परिचय कॉटिल्य ग्रीन क्लबचे समन्वयक व वनस्पती शास्त्रीय विभागाचे प्रमुख गीते सर यांनी केला. प्रमुख व्याख्याते संतोष रणखांब यांनी जलसंवर्धन ही काळाची गरज या विषयावर सखोल असे विचार मांडले पाणी जीवन जगण्याचे मुख्य साधन आहे. जीवाची निर्मिती पाण्याच्या माध्यमातून झाली व पृथ्वीवर प्रत्येक सजीवास व आवश्यक त्या घडामोडी साठी पाणी एक महत्त्वाचा घटक आहे.

हवामान कृती यांनी जलसंवर्धनावर काम करणाऱ्या संस्थांना पाठिंबा देऊन फरक घडू शकतो. विद्यार्थ्यांनी केलेल्या भीतीपत्राकाची इमोशन करताना सहभागी विद्यार्थ्यांची विशेष कौतुक केले. महाविद्यालयाच्या प्राचार्य यांनी प्रमुख व्याख्याते संतोष रणखांब यांचे चाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. व तसेच या कार्यक्रमासाठी सिने नाटक कलावंत संघटना पत्रकार संघ, पत्रकार गायकवाड, सिद्धार्थ तायडे, लेखक दिग्दर्शक विकास वाघमारे पत्रकार, यांची उपस्थित होती. त्यांनीही प्रमुख व्याख्याते यांचे पुष्पहार देऊन सत्कार केला.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन गीते सर व सूत्रसंचालन वनस्पतीशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक सोमनाथ किरवले यांनी केले. व त्यांना हरिदास कराड यांचे योगदान लाभले कार्यक्रमासाठी उपस्थित आमचे आभार प्रदर्शन रामेश्वर साठे यांनी मानले व अध्यक्षांच्या वतीने कार्यक्रम संपन्न झाला असा जाहीर केले.

# वाल्मिक कराडपासून दादासाहेब खिंडकरच्या जिविताला धोका

## पत्नी अश्विनी खिंडकर यांचे कारागृह अधीक्षकांना पत्र; सुरक्षेसाठी गार्ड देण्याची मागणी



बीड । प्रतिनिधी

संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मीक कराडसह इतर आरोपींपासून आपले पती दादासाहेब खिंडकर यांच्या जिवीताला धोका असल्याची भिती अश्विनी खिंडकर यांनी व्यक्त केली आहे. याबाबत त्यांनी कारागृह अधीक्षकांना निवेदन देऊन सुरक्षेसाठी गार्ड देण्याची मागणीही केली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य सुत्रधार वाल्मीक कराड, सुदर्शन घुले, जयराम चाटे, सुधीर सांगळे आदी आरोपी जिल्हा कारागृहात आहेत. तर, ओंकार सातपुते मारहाण प्रकरणाचा व्हिडीओ समोर आल्याने दादासाहेब खिंडकरसह इतर आरोपींवर पिंपळनेर पोलिस ठाण्यात कट रचून अपहरण व जिवे मारण्याच्या प्रयत्नाच्या कलमाखाली गुन्हा नोंद झाला.त्याची १० दिवसांची पोलिस कोठडी संपल्याने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावल्याने त्याचीही जिल्हा कारागृहात रवानगी करण्यात आली. दादासाहेब खिंडकर हा संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांचा साडू आहे. देशमुख खुन प्रकरणातील प्रत्येक आंदोलन व इतर प्रक्रियांमध्ये खिंडकर देशमुख यांच्यासोबत असे. दरम्यान, आता वाल्मीक व खिंडकर एकाच कारागृहात असल्याने खिंडकरच्या जिवीताला वाल्मीक कराडपासून धोका असल्याची भीती त्याच्या पत्नीला आहे. पतीच्या संरक्षणाची जबाबदारी घेऊन, कायमस्वरूपी पोलीस गार्डचे संरक्षण द्यावे, तसेच इतर बरॅकमध्ये त्याला हलवावे, व सिसीटीव्हीच्या निगराणीखाली ठेवावे, अशी मागणी अश्विनी खिंडकर यांनी कारागृह अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे. बीड जिल्ह्यात धनंजय देशमुखांच्या साडूचा म्हणजेच दादासाहेब खिंडकर याचा एक जूना व्हिडिओ समाजमाध्यमावर प्रचंड व्हायरल झाला होता. यात खिंडकर एका व्यक्तीला बेदम मारहाण करताना दिसत आहे. हा व्हिडिओ जूना असून तो वाद कधीच मिटल्याचा दावा खिंडकर याने केला होता. मात्र दादासाहेब खिंडकर याच्यावर घरफोडी, पैसे उकळून फसवणूक प्रकरणात गंभीर गुन्हे नोंद आहेत. बीड तालुक्यातील बाभुळवाडी गावचा सरपंच असलेल्या दादासाहेब खिंडकर याच्या ताब्यात गेल्या दहा वर्षापासून ही ग्रामपंचायत असल्याचे बोलले जाते.



# तर बीडचे मणिपूर होईल खा.रजनीताई पाटील यांचा सरकारवर हल्लाबोल

केज । प्रतिनिधी

राज्यसभेत काँग्रेस नेत्या खा.सौ.रजनीताई पाटील यांनी बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येवरून राज्य आणि केंद्र सरकारवर हल्लाबोल केला.त्यांनी काश्मीर मधील स्थिती विषयी आणि गृह मंत्रालयाच्या असमाधानकारक कामगिरीवर देखील तीव्र शब्दात टीका केली व सरकारला धारेवर धरले. बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या क्रूर हत्येने राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचेअपयश पुन्हा उघड झाले.वेळीच आरोपींवर कारवाई झाली नाही,तर बीड जिल्हा आणि महाराष्ट्राचे मणिपूर होण्यास वेळ लागणार नाही असे एका स्थानिक शेतकऱ्याने काँग्रेसच्या सद्भावना यात्रेच्या वेळी सांगितले असा अनुभव सांगताना काँग्रेस नेत्या खा.सौ.रजनीताई पाटील यांनी शुक्रवारी केंद्र व राज्य सरकारवर हल्लाबोल केला.राज्य सभेत मराठीतून केलेल्या १० मिनिटांच्या भाषणात पाटील यांनी विविध मुद्द्यांवरून केंद्रावर टीकास्त्र सोडले.जम्मू आणि काश्मीर मधील परिस्थिती सामान्य होत असल्याचे केंद्र सरकार वारंवार सांगत आहे.मग काश्मीरमधील सुरक्षेसाठी यंदाच्या ४१ हजार कोटी रुपयांची मोठी तरतूद का करावी लागली ? मोदी सरकारने काश्मिरी पंडितांचा वापर केवळ राजकीय शस्त्र म्हणून केला आहे.त्यांना मदत न करता त्यांच्यावर चित्रपट बनवण्याचे आणि त्याबद्दल फक्त बोलण्याचे काम त्यांनी केले आहे असे टीकास्त्र खा.सौ. रजनीताई पाटील यांनी सोडले.



सन २०२५-२६ च्या अर्थ संकल्पात गृह मंत्रालया साठी २ लाख ३३ हजार २११ कोटींची तरतूद करून ही या मंत्रालयाची कामगिरी असमाधान कारक आहे.निमलष्करी दलांत मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे आत्महत्या, मानसिक ताण,सेवा निवृत्ती आधीच राजीनामा देण्याचे प्रमाण वाढत आहे.सीआरपीएफ मध्ये नऊ टक्के कमी मनुष्य बळ आहे.या दलांच्या आधुनिकीकरणासाठी ४,०६९ कोटींची तरतूद केली आहे.परंतु गेल्या काही वर्षांत ९० टक्के अनुदान वाटप झालेले नाही.नारी शक्ती वंदन चा गवगवा करणाऱ्या या सरकारच्या काळात निम लष्करी दलांमध्ये महिला कर्मचाऱ्यांचे प्रमाण फक्त चार टक्के आहे असे खा. रजनीताई पाटील म्हणाल्या.काँग्रेस कडून पाटील यांना २० मिनिटांचा वेळ बोलण्या साठी देण्यात आला होता मात्र आधीच्या वक्त्यांचे भाषण लांबल्याने पाटील यांना फक्त सात ते आठ मिनिटे मिळाली.भाषण घाईघाईने वाचताना खा.रजनीताई पाटील यांना खोकल्याची जबरदस्त उबळ आली.ते पाहून ज्येष्ठ सदस्या सुधा मूर्ती या भाजपच्या बाका वरून पुढे आल्या आणि त्यांना पाण्याची बाटली दिली.घरी जाताना पाटील यांनी आभार मानल्यावर मूर्ती यांनी,पक्षाचा इथे काय संबंध? अडचणीत आपणच मदत करायची असते असे सांगितले.

# केज शहरातील मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण धारकांना नोटीस

## पंधरा दिवसात अतिक्रमण काढा अन्यथा पोलिस बंदोबस्तात होणार कारवाई

केज । प्रतिनिधी

केज शहरातील मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण धारकांना प्रशासनाकडुन नोटीस देण्यात येत असुन पंधरादिवसात अतिक्रमण काढुन घ्यावे अन्यथा पोलिस बंदोबस्तामध्ये अतिक्रमण काढण्यात येईल अशी नोटीस देण्यात येत आहे त्यामुळे अतिक्रमण धारकांचे धाबे दणाणले असुन पुन्हा कुठे बस्तान थाटायचे याचा विचार करताना दिसत आहेत.यामुळे आता रस्ते मोकळा श्वास घेणार असुन पथरस्ता मोकळा होऊन वहातुक सुरळीत होणार आहे.

सदरील नोटीसमध्ये असे म्हटले आहे की, राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी पिंपळा जंक्शन ते मांजरसुंभा कि.मी ५५/६१५ ते कि.मी१३७/३०० रस्त्याची मालकी हद्द रस्त्याच्या मध्यापासुन १५ मीटर अंतरापर्यंत दोन्ही बाजुस (एकुण ३० मीटर रुंदीची जागा) ही, मुंबई महामार्ग अधिनियम १९५५ च्या कलम २० नुसार तसेच शासननिर्णय क्र.बीएचए ३७६५/११६३४८-सी (१) दिनांक १९.०४.१९६७ च्या अधि सुचनेनुसार शासकीय जागा आहे. या मुळ रस्त्याच्या मध्यापासुन आपण १५मीटर (५०फुट) च्याआत शासकिय जागेत अनाधिकृत रित्या अतिक्रमण करुन मुंबई महामार्ग अधिनियम १९५५ च्या कलम २१(१) चे उल्लंघन केले आहे.



करिता आपणांस मुंबई महामार्ग अधिनियम १९५५ च्या कलम २३ नुसार सुचित करण्यात येते की,आपण अनाधिकृत अतिक्रमण, हे पत्र मिळाल्याच्या दिनांकापासुन १५ दिवसाच्या आत काढुन घ्यावे व शासकिय जागा पुर्ववत करण्यात यावी. तर आपण वरिल (२) मध्ये उल्लेख केलेल्या मुदतीच्या आतअतिक्रमण काढले नाही तर मुंबई महामार्ग अधिनियम १९५५ च्या कलम २३ (३) मध्ये दर्शविलेल्या तरतूदीप्रमाणे गुन्हादाखल करण्याची कार्यवाही करण्यात येईल व गरज पडल्यास पोलीसांच्या मदतीने आपल्या परवानगी शिवाय अतिक्रमण काढुन टाकण्यात येईल.

अतिक्रमण काढण्यासाठी, हटविण्या साठी खात्यास येणाऱ्या खर्चाची भरपाई, मुंबई महामार्ग अधिनियम १९५५ च्या कलम २५ नुसार आपल्याकडुन वसुल करण्यात येईल. अतिक्रमणात काढलेले साहित्य जप्त करण्यात येवुन खात्याने अतिक्रमण काढण्यायाठी केलेल्या खर्चाची आपणांकडुन वसुली झाल्याशिवाय परत करण्यात येणार नाही किंवा भरपाई देण्यास आपण नकार दिल्यास किंवा टाळाटाळ केल्यास २५ (४) नुसार, जप्त केलेल्या साहित्याचा लिलाव करुन खर्चाची भरपाई करण्यात येईल.

खात्यामार्फत अतिक्रमण काढल्यामुळे होणाऱ्या नुकसानीस आपण स्वतः जबाबदार राहाल व झालेल्या नुकसानीचे कोणतेही भरपाई कलम ३४ नुसार आपणांस मिळणार नाही याची नोंद घ्यावी असे नोटीस मध्ये म्हटले आहे.

# दोन समाजात तेढ निर्माण करणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल

माजलगाव । प्रतिनिधी

दोन समाजात द्वेष भावना वाढविण्याच्या उद्देशाने सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या ४ इसमा विरुद्ध माजलगाव शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि.२१ मार्च २०२५ रोजी २१ वा. माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्य तळ यांनी माहिती आली की १) शुभम कांबळे २) ओंकार घोडके ३) शुभम पाटील ४) विशाल सोळंके यांनी दोन समाजात तेढ निर्माण होईल अशा आक्षेपार्ह पोस्ट त्यांच्या सोशल मीडियावरील इंस्टाग्राम वरून प्रसारित केले आहे अशी माहिती मिळाल्याने पोलिसांनी नमूद इसमाचे इंस्टाग्राम खाते तपासले असता पोलिसांना नमूद इस्मानी दोन समाजातील तेढ निर्माण होईल अशा प्रकारच्या आक्षेपार्ह पोस्ट त्यांच्या सोशल मीडियावरील इष्टग्राम वरून प्रसारित केले असल्याचे मिळून आल्याने नमूद ०४ इसमा विरुद्ध पोलीस अमलदार अमोल कदम यांच्या फिर्यादीवरून गु.र.न.११७/२०२५कलम६६ माहिती तंत्रज्ञान अधिनियम-२०००सह कलम ३५३(२) भारतीय न्याय संहिता प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक राहुल सूर्य तळ हे करीत आहे नागरिकांनी सोशल मीडियावर पोस्ट करताना सामाजिक भावना लक्षात घेऊन पोस्ट करावे सवेदनशील राहावे कोणीही विनाकारण समाजातील तेढ निर्माण होईल अशा प्रकारच्या पोस्ट करून सामाजिक सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न करू नये असे आवाहन माजलगाव शहर पोलिसांनी केली आहे.

# कांद्याच्या निर्यातीवर लावलेले २० टक्के निर्यात शुल्क तत्काळ हटवा : वैभव शिंदे

नेकनूर । प्रतिनिधी



देशांतर्गत बाजारपेठेत कांद्याचे भाव कोसळल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवर लावलेले २० टक्के निर्यात शुल्क तत्काळ हटविण्याची मागणी, वैभव शिंदे यांनी केली आहे. केंद्र सरकारने ग्राहक हितासाठी कांदाप्रश्नी सातत्याने हस्तक्षेप केला आहे. घेतलेले निर्णय कांदा उत्पादकांसाठी अडचणीचे ठरत आहेत. यामुळे कांद्याची आवक वाढल्याने दर घसरले आहेत. यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत असून आर्थिक कोंडी वाढली आहे.

राज्यातील कांद्याला परदेशात मोठी मागणी आहे. मात्र, सरकारनं कांद्याच्या निर्यातीवर २० टक्के शुल्क लावले आहे. त्यामुळं त्याचा परिणाम थेट कांद्याच्या निर्यातीवर होत आहे. कांद्याचे दर हे सातत्याने कमी होत आहेत. ३००० रुपयाने विक्री होणारा कांदा १५०० रुपयांवर आला आहे. आणखी दर कमी होण्याची शक्यता आहे. दरवर्षीच्या तुलनेत यावर्षी लेट खरीप कांद्याचे उत्पादन वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अशातच कारण नसताना सरकारनं कांदा निर्यातीवर २० टक्के निर्यात शुल्क लागले आहे. राज्य सरकारने निर्यात शुल्क हटवण्यासाठी केंद्राकडे पाठपुरावा करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा. राज्यभरातील बाजार समित्यांमध्ये कांद्याची वाढलेली आवक व कांद्याचे भाव कोसळल्याने शेतकऱ्यांवर ओढावलेल्या संकटाबाबत तोडगा काढावा व तातडीने निर्यात शुल्कासंदर्भात सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी वैभव शिंदे यांनी केली आहे.

# शिवछत्र परिवाराच्या रोजा इफ्तार पार्टीला उत्स्फूर्त प्रतिसाद

## अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित यांनी दिल्या मुस्लिम बांधवांना शुभेच्छा

गेवराई । प्रतिनिधी

मुस्लीम समाजाच्या पवित्र रमजान निमित्ताने माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित परिवाराच्या वतीने गेवराई येथे आयोजित केलेल्या रोजा इफ्तार पार्टीला हिंदू अणि मुस्लिम बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित, जयसिंग पंडित युवानेते पृथ्वीराज पंडित, रणवीर पंडित यांनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. आजच्या या इफ्तार पार्टीला मुस्लिम बांधवांसोबत हिंदु बांधवही मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्यामुळे शिवछत्र परिवाराच्या या इफ्तार पार्टीत हिंदू मुस्लिम समाजातील ऐक्य पुन्हा एकदा दिसुन आले.

माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित कुटूंबीय व शिवछत्र परिवाराच्या वतीने सालाबादाप्रमाणे मुस्लीम समाजाच्या पवित्र रमजान निमित्ताने रोजा इफ्तार पार्टीचे भव्य आयोजन केले होते. रमजान महिण्याच्या निमित्ताने शनिवार दि. २२ मार्च रोजी सायं. ६ : ४२ वाजता छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक भवन, नगर परिषद कॉम्लेक्स, गेवराई येथे भव्य इफ्तार पार्टीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रोजा ईफ्तार पार्टीला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित जयभवानी व जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव जयसिंह पंडित, युवानेते पृथ्वीराज पंडित, रणवीर पंडित, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, भवानी बँकेचे उपाध्यक्ष मुहम्मद अब्दुल हन्नान, मुहम्मद गौस, संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष दादासाहेब घोडके, मनोज हजारे, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, माजी नगरसेवक राधेश्याम येवले, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दीपक तात्या आतकरे, तालुका उपाध्यक्ष दत्ताभाऊ दाभाडे, कांतासेठ नवपुते, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते एस.वाय.अन्सारी, माजी नगरसेवक सय्यद नजीबभाई, माजी उपनगराध्यक्ष शेख खाजाभाई, एजाज अत्तार, मुहम्मद आवेज शरीफ, सय्यद शफी अत्तार, ज्येष्ठ पत्रकार काझी अमान, पत्रकार अयुब बागवान, राष्ट्रवादी अल्पसंख्यांक आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष सरवरखान पठाण, तालुकाध्यक्ष अब्दुल खालेक कुरेशी, धोंडराई सर्कलचे युवानेते अजीम इनामदार, वसीम फारुकी, नवीद मशायक, शेख मोहसीन भाऊ, शेख मकसूद, बागवान समाजाचे अध्यक्ष माणिकसेठ बागवान, अब्दुल सत्तार कुरेशी, जानमोहम्मद बागवान, माजी नगरसेवक मंजूर बागवान, मोहसीन बागवान, शब्बू मशायक, काझी शौकत, गुफरान इनामदार, नईम बिल्डर, नईम बागवान, काझी शफिक काझी शकील यांच्यासह गेवराई शहर व तालुक्यातील रोजदार मुस्लिमबांधव बहुसंख्येने उपस्थित होते.



हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT